I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
(Under Section 173 B.N.S.S)

## प्रथम खबर अहवाल
(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)

1. **District (जिल्हा):** सोलापुर ग्रामीण **P.S. (पोलीस ठाणे):** पंढरपूर शहर **Year (वर्ष):** 2025

**FIR No. (प्रथम खबर क्र.):** 0652 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 10/10/2025 07:28 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence(गुन्ह्याची घटना):**

1 **Day (दिवस):** गुरूवार **Date from (दिनांक पासून):** 09/10/2025 **Date To (दिनांक पर्यंत):** 09/10/2025

**Time Period (कालावधी):** प्रहर ६ **Time From (वेळेपासून):** 16:30 तास **Time To (वेळेपर्यंत):** 16:30 तास

(b) **Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा):** **Date (दिनांक):** 10/10/2025 **Time (वेळ):** 07:00 तास

(c) **General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ):** **Entry No. (नोंद क्र.):** 015 **Date and Time (दिनांक आणि वेळ):** 10/10/2025 07:13 तास

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1. **(a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर):** पश्चिम, 1 कि.मी. **Beat No. (बीट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** तहसिल कार्यालयाच्या पाठीमागे, रायगड भवन,पंढरपुर , पंढरपुर ,पंढरपुर

**(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (State) (जिल्हा (राज्य)):**

6.

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)

**Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** श्री.प्रविण नारायण निंबाळकर

(b) **Father's Name (चे नाव ):** नारायण निंबाळकर

(c) **Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष):** 1986

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No. (पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख ):** **Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))**

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

(h) **Occupation (व्यवसाय):**

(i) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे , पुणे शहर, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे , पुणे शहर, महाराष्ट्र, भारत |

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल क्र.):** 91-9552574140

**7. Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):**

**Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या):** 0

| S. No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address(वर्तमान (पत्ता)) |
|---|---|---|---|---|
| 1 | राजेंद्र भगवान वाघमारे | | वडील चे नाव : भगवान वाघमारे | 1. मंडल अधिकारी करकंबपंढरपुर,Town/Village (शहर / गाव): भाळवणी,Tehsil (तहसील): पंढरपुर,Police Station (पोलीस ठाणे): पंढरपूर शहर,District (जिल्हा): सोलापुर ग्रामीण,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S. No. (अ.क्र.) | Propertty Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (विवरण) | Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | तडजोडीअंती रुपये 40,000/ | 40,000.00 |

**10. Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :** 40,000.00

**11. Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):**

| S. No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.) |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम खबर हकिगत):**

मी.श्री.प्रविण नारायण निंबाळकर,वय-39 वर्षे व्यवसाय नोकरी,पद-पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे मो.नं.9552574140.

मी वरील प्रमाणे असुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे येथे पोलीस निरीक्षक म्हणुन

कार्यरत आहे.दि.08.10.2025 रोजी मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग ,पुणे येथे हजर असताना 17.00 वा चे सुमारास प्रशासन अधिकारी श्री.दयानंद गावडे, पोलीस उपअधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी बोलावुन घेऊन तेथे उपस्थित असलेले तक्रारदार श्री.भास्कर लक्ष्मण कसगावडे यांची लाच मागणी होत असलेबाबतची तक्रार असून आपण त्यांची तक्रार ऐकुण घेवून त्याप्रमाणे पुढील कायदेशीर कारवाई करा असे आम्हास आदेशित केले.तसेच सदर कार्यवाहीकामी पोलीस निरीक्षक हट्टेकर ,मपोहवा गोरे, मपोशि शेटे शासकीय वाहन इरटिगा एमएच 12 यु.सी.4109 त्यावरील चालक सपोफौ अविनाश चव्हाण असे पथक मदतीस दिले व जलसंपदा विभागाचे दोन पंच उपलब्ध करुन त्यांचे संपर्क क्रमांक दिले.त्यानंतर मी तक्रारदार श्री.कसगावडे यांना माझे कक्षात घेऊन आलो.त्यानंतर काही वेळाने पंच 1.श्री.निलेश मॉच्छद्र घनवट,वय-30 वर्षे पद- स्थापत्य अभियांत्रीकी सहायक,जलसंपदा विभाग, येरवडा, पुणे रा.आदर्श कॉलनी आव्हाळवाडी,वाघोली,पुणे व 2.श्री.सुजय मदन सोनार,वय-27 वर्षे ,पद. स्थापत्य अभियांत्रीकी सहायक,जलसंपदा विभाग, येरवडा,पुणे.रा.रोनक पी जी (पेईंग गेस्ट)नेताजी हायस्कुल जवळ येरवडा पुणे, हे उपस्थित झाले.सदर वेळी तक्रारदार श्री.भास्कर लक्ष्मण कसगावडे व नमुद दोन्ही पंच तसेच सापळा पथकातील अधिकारी अंमलदार यांची ओळख करुन दिली.त्यानंतर नमूद पंच साक्षीदार यांना आम्ही तक्रारदार श्री.भास्कर लक्ष्मण कसगावडे यांची लोकसेवकाविरुध्द लाच मागणी होत असलेबाबतची तक्रार असून पुढील कार्यवाही करणेकामी पंच म्हणून उपस्थित राहून काम करणेस तयार आहात का?अशी विचारणा करता त्यास दोन्ही पंच साक्षीदार यांनी होकार दिला.त्याप्रमाणे पंच क्र.1 म्हणून श्री. निलेश मॉच्छद्र घनवट पंच क्र.2 म्हणून .श्री.सुजय मदन सोनार हे काम पाहतील असे सर्वानुमते ठरविण्यात आले.सदर वेळी तक्रारदार यांनी त्यांची तक्रार प्रथम तोंडी कथन केली व नंतर लेखी स्वरुपात दिली ती पुढीलप्रमाणे.

तक्रारदार भास्कर लक्ष्मण कसगावडे,वय-46 वर्षे ,धंदा शेती-व्यापार रा.बोहाळी, ता.पंढरपुर .जि.सोलापुर मो.नं.9822222181.

“मी वरीलप्रमाणे असुन वर नमुद पत्त्यावर माझे परीवारासह राहणेस आहे.माझे मालकीची मौजे करकंब ,ता.पंढरपुर येथे गट नं.999/1 मधील माझी व माझा भाऊ सुधाकर लक्ष्मण कसगावडे यांचे नावे असलेली 81 आर शेती क्षेत्र आम्ही दि.21.05.2025 रोजी नोंदणीकृत दस्ताने श्री.निलेश गजानन वाडकर व सौ.तृप्ती निलेश वाडकर यांना विकलेली आहे.सदर दस्ताची नोंद प्रमाणीत करणेसाठी व 7/12 उता-यावर जमीन खरेदी करणा-यांची नावे नोंद होण्यासाठी आम्ही मौजे करकंब गावचे तलाठी कार्यालयात अर्ज दिला होता.त्यावर तेथील तलाठी यांनी नोंद धरुन ती मंजुरीकरीता करकंब मंडलचे सर्कल अधिकारी राजेंद्र वाघमारे यांचेकडे पाठविली होती.सर्कल अधिकारी वाघमारे यांनी माझी नोंद फेटाळली असल्याचे सांगितल्याने मी त्यांना दि.07/10/2025 रोजी जाऊन भेटलो असता त्यांनी मला सांगितले की, तुमची नोंद मी मंजूर करतो पण त्यासाठी मला 50,000/- रुपये दया.

सर्कल राजेंद्र वाघमारे यांनी मागितलेले 50,000/- रुपये ही लाच रक्कम असुन ती देण्याची माझी इच्छा नाही. त्यांचेत व माझेत कोणताही आर्थिक व्यवहार नाही.तरी त्यांचेवर कारवाई व्हावी ही विनंती. माझा तक्रारी अर्ज मी स्वहस्ताक्षरात लिहीला असुन तो बरोबर आहे.” तरी त्यांचेवर कारवाई व्हावी ही विनंती.”वगैरे मजकुराची तक्रार तक्रारदार यांनी स्वहस्ताक्षरात लिहून दिली नंतर सदरची तक्रार आम्ही व पंच साक्षीदार यांनी वाचून त्यावर सहया केल्या.

त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री.कसगावडे यांना नमूद लोकसेवक राजेंद्र वाघमारे मंडल

अधिकारी यांनी कधी व कुठे भेटण्यास बोलाविले आहे अशी विचारणा करता तक्रारदार यांनी सांगितले की,आज उशीर झाला आहे व कार्यालय बंद झाले आहे.उदया दि.09/10/2025 रोजी तुम्ही पंढरपुर जि.सोलापुर येथे या त्यानंतर आपण पुढील कारवाई करु असे सांगितलेने व पुढील कारवाई दि.09/10/2025 रोजी करणेचे ठरलेने आम्ही नमुद दोन्ही पंचाना कारवाई बाबत गोपनियता राखणेच्या सुचना देऊन दि.09/10/2025 रोजी सकाळी 06.00 वा लाप्रवि ,पुणे कार्यालयात हजर राहणेबाबत सांगितले.

आम्ही दि.08/10/2025 रोजी दिलेल्या सुचने नुसार दि.09/10/2025 रोजी सकाळी 06.00 वाजता लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे येथे दोन्ही पंच व सापळा पथक हजर झाले. त्यानंतर तक्रारदार त्यांचे वाहनामधुन व आम्ही शासकिय वाहनामधुन पडताळणी व सापळा कारवाईकामी लागणारे साहित्य घेऊन पंढरपुर,जि.सोलापुर येथे पोहोचलो ती वेळ 12.30 वा ची होती.त्यानंतर थोडया वेळाने सापळा पथक हे तक्रारदार यांनी सांगितले प्रमाणे तक्रारदार यांचे बन्सल क्लासेस ,मनिषा नगर ,पंढरपुर येथे पोहोचलो ती वेळ 13.45 वा ची होती.

त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री.कसगावडे यांचेकडे राजेंद्र वाघमारे सर्कल हे लाच मागणी करतात अगर कसे? याबाबतची पडताळणी करण्याचे सर्वानुमते ठरविले. .पडताळणीसाठी पंच क्र.1 म्हणुन श्री. निलेश मॉच्छद्र घनवट पंच क्र.2 म्हणून .श्री.सुजय मदन सोनार हे काम पाहतील असे ठरविण्यात आले.त्यानंतर तक्रारदार व पंच क्र.1 घनवट पंच क्र.02 सोनार यांचे निवेदन घेण्याचे ठरले.त्यानंतर आम्ही आमचेकडील सोनी कंपनीचे व्हॉईस रेकॉर्डर काढून त्यामध्ये सॅनडीस्क कंपनीचे नवीन सिलबंद मेमरीकार्ड त्यांचे वेस्टनातुन बाहेर काढले ते व्हॉईस रेकॉर्डरमध्ये घातले.व्हॉईस रेकॉर्डर चालू करून त्याबाबत माहिती दिली तसेच त्याचे इनबिल्ट मेमरीमध्ये व मेमरीकार्डमध्ये यापुर्वीची कोणतीही फाईल नसल्याचे उपस्थित सर्वांची खात्री करून दिली.त्यानंतर तक्रारदार कसगावडे व पंच पंच क्र.1 घनवट पंच क्र.02 सोनार यांचे पडताळणी निवेदन घेतले ती वेळ 14.21 वा ची होती.त्यानंतर तक्रारदार श्री.कसगावडे यांना राजेंद्र वाघमारे मंडल अधिकारी यांचेकडे लाच मागणी पडताळणी कामी पाठवण्याचे ठरले.त्यानंतर आम्ही उपस्थित पंच साक्षीदार, तक्रारदार व सापळा पथकास पुढील पडताळणी कार्यवाहीचे अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या व व्हाईस रेकॉर्डर पुन्हा चालू करून तो तक्रारदार श्री.कसगावडे यांनी परिधान केलेल्या शर्टचे आतील बाजुस सेफटी पिन च्या सहाय्याने लावुन दिला व तक्रारदार यांना पंच क्र.01 श्री.घनवट यांचेसह पडताळणीकामी तक्रारदार यांचेकडील चारचाकी क्रेटा क्र.एम.एच-13 डीई 5055 मधुन महसुल कल्याण निधी रायगड भवन ,पंढरपुर उप विभाग,पंढरपुर तहसिल कार्यालयाचे पाठीमागे येथे रवाना केले ती वेळ 14.34 वा ची होती.

त्यानंतर आम्ही सापळा पथक पंच क्र.02 असे बन्सल क्लासेस दुसरा मजला मनिषानगर पंढरपुर येथे थांबुन राहिलो. त्यानंतर काही वेळाने तक्रारदार व पंच नं.01 असे आम्ही थांबलेल्या ठिकाणी परत आले.त्यावेळी आम्ही तक्रारदार यांचे अंगावरील व्हाईस रेकॉर्डर काढून बंद केला ती वेळ 15.03 वा.ची होती.त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना गेल्यापासुन येईपर्यंत काय झाले असे विचारले असता त्यांनी सांगितले की,मी व पंच क्र.1 श्री.घनवट असे महसुल कल्याण निधी रायगड भवन ,पंढरपुर उप विभाग,पंढरपुर येथे गेलो असता सदर ठिकाणी राजेंद्र वाघमारे ,सर्कल हे तेथे उपस्थित होते.त्यावेळी मी व पंच घनवट असे त्यांचे कार्यालयात गेलो.त्यावेळी त्यांचेत व माझेत

माझ्या कामासंबंधी चर्चा झाली सदर चर्चे दरम्यान त्यांनी पंच क्र.01 यांचे बद्दल मला विचारणा केली असता मी निलेश पाहुणे मावस भाऊ आहे असे सांगुन माझे शेजारी पंचांना बसणेस सांगितले त्यानंतर माझे कामासंदर्भात चर्चा केली त्यावेळी लोकसेवक यांनी हयाज काय? असे बोलुन उजव्या हाताचा अंगठा व बोटाने पैशाचा इशारा केला त्यावर मी “ते तेच कि कीती.”? असे बोललो असता काय ते तेवढच पाहीजे, काय ती आमची अपेक्षा होती काय म्हणल होत असे बोलून मोबाईल वर 1 आकडा टाईप करून दाखवला व एक करा म्हणत होतो आम्ही असे सर्कल वाघमारे बोलले असता मी त्यांना “एक लाख लई होत, पन्नास,पन्नासला काय, थोड फार ,तर माझ्याकड बघुन” असे बोललो असता त्यांनी “चाळीस दया” असे बोलले. त्यावर मी बोललो की ,चाळीस? हम एक दहा मिनीटात कागद आणि पैशे आणुन देतो त्यावर लोकसेवक यांनी “हमम” असे बोलुन माझे दस्ताची नोंद मंजुर करणेसाठी व 7/12 उता-यावर जमीन खरेदी करणा-यांची नावे नोंद होण्यासाठी माझेकडे 40,000/- रुपयाची लाच मागणी केली.त्यांनतर मी व पंच क्र.01 आपण थांबलेल्या ठिकाणी परत आलो.त्यानंतर पंच क्र.01 घनवट यांना गेलेपासुन येईपर्यंत काय झाले याबाबत विचारणा केली असता पंच क्र.01 घनवट यांनी तक्रारदार यांचेप्रमाणे हकिकत सांगितली. त्यानंतर आम्ही व्हॉईस रेकॉर्डरमधील मधील ध्वनिमुद्रीत संभाषण फास्ट फॉरवर्ड करून ऐकले असता ते तक्रारदार व पंच क्र.1 यांनी सांगितलेली हकिकतप्रमाणे खरे असलेबाबतची खात्री केली.

एकंदरीत तक्रारदार यांनी केलेल्या तक्रारीप्रमाणे मंडल अधिकारी राजेंद्र वाघमारे यांचेकडे दि.09/10/2025 रोजी पडताळणी कामी पाठवले असता सदर पडताळणी कारवाई दरम्यान तक्रारदार यांनी विक्री केलेल्या शेती क्षेत्राच्या दस्ताची नोंद संबंधीत तलाठी यांनी धरुन ती नोंद मंजुरीकरीता मंडल अधिकारी वाघमारे यांचेकडे पाठवली होती.सदर नोंद फेटाळली असल्याचे सांगुन सदर नोंद प्रमाणित करणेसाठी व 7/12 उता-यावर जमीन खरेदी करणा-यांची नावे नोंद मंजुर करण्यासाठी तक्रारदार यांचेकडे तडजोडीअंती 40,000/- रुपयाची लाच मागणी केली असल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर आम्ही दोन्ही पंचांना व तक्रारदार भास्कर कसगावडे यांना सापळापुर्व पंचनामा कारवाई सुरू करण्यात येत असल्याबाबत सांगितले.त्यानंतर आमचे सुचनेनुसार तक्रारदार कसगावडे यांना दोन्ही पंचांसमक्ष लाच रक्कम हजर करणेस सांगितले असता तक्रारदार यांनी लाच रक्कम 40,000/- रुपये हजर केले.त्यानंतर मपोशि शेटे यांनी नमुद नोटांचे नंबर पंच क्र.02 सोनार यांचे मदतीने कागदावर लिहुन काढले.

त्यानंतर तात्काळ सापळा कारवाई आयोजीत करण्याचे ठरवले.त्यानंतर आम्ही दोन्ही पंचांना पडताळणी व सापळा कारवाई यशस्वी झाल्यास लोकसेवकाची “अंगझडती व लाचेची रक्कम”जप्त करण्याच्या कारवाईचे चित्रीकरण नवीन सिलबंद मेमरी कार्ड मध्ये करण्यात येणार असल्याचे सांगितले.

त्यानंतर डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करून त्यामध्ये प्रथम तक्रारदार कसगावडे त्यानंतर पंच क्र.01 श्री.घनवट व पंच क्र.02 सोनार यांचे निवेदन ध्वनीमुद्रीत केले ती वेळ 15.45 वा ची होती.

त्यानंतर आम्ही बन्सल कलासेस च्या एका रुम मध्ये दोन्ही पंचांना व तक्रारदार कसगावडे यांना अन्थ्रासिन पावडरचे गुणधर्म समजावून सांगून त्याचे प्रात्यक्षिक सपोफौ चव्हाण

चालक यांनी करून दाखवले.त्यानंतर तक्रारदार यांनी हजर केलेले लाचेकामी वापरावयाची रक्कम रूपये 40,000/- (रूपये 500/- दराच्या 80 चलनी नोटा) या सपोफौ चव्हाण चालक यांना अ‍ॅन्थ्रासीन पावडर लावण्याकरीता दिल्या असता, सपोफौ चव्हाण चालक यांनी कापसाच्या बोळयाने प्रत्येक चलनी नोटांच्या दोन्ही बाजूस अ‍ॅन्थ्रासीन पावडर लावली व त्यांनतर सपोफौ चव्हाण चालक यांनी सदर रबर लावलेली लाचेची रक्कम तक्रारदार कसगावडे यांच्या नेसणीस असलेल्या निळया रंगाच्या जिन्स पॅन्टच्या पुढील उजव्या खिशात ठेवली.त्यानंतर आम्ही पंचांना तक्रारदार व पोलीस पथकातील अंमलदार यांना सापळा कारवाईचे आयोजन करण्यात येत असल्याचे सांगून त्यांना योग्य त्या प्रमाणे सूचना दिल्या.

त्यानंतर राजेंद्र वाघमारे,सर्कल यांनी मागणी केलेली लाच रक्कम देणेकरीता तक्रारदार यांना शासकिय व्हॉईस रेकॉर्डर चालू करुन त्यांनी परीधान केलेल्या शर्ट चे आतील बनयिन ला सेफटी च्या सहाय्याने लावुन देऊन शासकिय पंच क्र.1 श्री.घनवट यांचेसह तक्रारदार यांचेकडील चारचाकी वाहन क्रेटा क्र.एम.एच-13 डीई 5055 ने महसुल कल्याण निधी रायगड भवन , पंढरपुर उप विभाग,पंढरपुर तहसिल कार्याल
कार्यालयाच्या पाठीमागे येथे जाणेसाठी 16.03 वा. चे सुमारास रवाना केले. त्यांचे पाठोपाठ सापळा पथक रवाना झाले.तहसिल कार्यालयाच्या काही अंतरावर शासकिय वाहन कोणास संशय येणार नाही अशा प्रकारे थांबवले व पंच क्र.02 व सापळा पथक चालत तक्रारदार यांचे पाठोपाठ निघालो व रायगड भवन ,पंढरपुर तहसिल कार्यालयाच्या पाठीमागे आवारात सापळा पथक कोणासही संशय येणार नाही अशा रितीने परिसरात थांबून होतो.तक्रारदार व पंच क्र.01 हे लोकसेवक यांचे कार्यालयात गेले थोडया वेळाने तक्रारदार हे लोकसेवक राजेंद्र वाघमारे सर्कल यांचे बरोबर चालत कार्यालयाचे बाहेर आले. तक्रारदार कसगावडे यांनी हातातील घडयाळ काढुन लाच रक्कम स्विकारले बाबत पुर्वनियोजीत इशारा केला त्यावेळी अचानक लोकसेवक राजेंद्र वाघमारे हे तेथुन पळुन जाऊ लागले त्यावेळी तक्रारदार हे धरा धरा त्याला असे म्हणाले असता लोकसेवक हे तहसिल कार्यालयाचे पाठीमागील बाजुचे उघडया  दरवाजामधुन तहसिल कार्यालयाकडे पळत गेले त्यावेळी आम्ही व सापळा पथक यांनी पाठलाग केला असता लोकसेवक राजेंद्र वाघमारे तहसिल कार्यालयाचे मुख्य गेट चे बाहेर मुख्य रस्त्याकडे पंढरपुर कराड रस्त्याकडे पळत असताना पोलीस निरीक्षक हट्टेकर यांनी त्यांना ताब्यात घेतले व त्यांचे दोन्ही हात पकडले. त्या वेळी आम्ही देखील त्यांचे पाठीमागे पोहोचलो व आम्ही तक्रारदार कसगावडे यांना लावण्यात आलेला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढून बंद केला.ती अंदाजे वेळ 16.30 वा.ची होती. त्यानंतर आम्ही लोकसेवक राजेंद्र वाघमारे यांना लाचलुचपत प्रतिबंध विभागाचे अधिकारी असल्याचे सांगून त्यांना हालचाल करण्यास मनाई केली. त्यांनतर आम्ही स्वत:ची व सापळा पथकाची ओळख सांगितली व  लोकसेवक राजेंद्र वाघमारे यांना त्यांचे नाव विचारता त्यांनी त्यांचे नाव राजेंद्र भगवान वाघमारे ,वय-53 वर्षे व्यवसाय नोकरी पद-मंडल अधिकारी करकंब ,पंढरपुर रा.भाळवणी ता.पंढरपुर जि.सोलापुर असे सांगितले.

त्यानंतर आम्ही पो नि हट्टेकर व सापळा पथक लोकसेवक राजेंद्र वाघमारे यांना शासकिय वाहनातुन त्यांचे कार्यालय रायगड भवन , पंढरपुर उप विभाग,पंढरपुर तहसिल कार्यालयाच्या पाठीमागे येथे घेऊन आले. त्यानंतर आम्ही लोकसेवक राजेंद्र वाघमारे यांना लाच रक्कम कुठे ठेवली आहे याबाबत विचारले असता त्यांनी सांगितले की,मी पळून जात असताना मी

माझा मोबाईल व लाच रक्कम टाकुन दिली ते नक्की ठिकाण आठवत नाही.त्यानंतर पंच क्र.01 श्री.घनवट यांना सापळा कारवाईसाठी गेले पासुन येई पर्यंत काय झाले याबाबत विचारणा करता त्यांनी सांगितले की,मी व तक्रारदार असे लो◌ेकसेवक राजेंद्र वाघमारे यांचे कार्यालयात गेलो सदर वेळी तक्रारदार यांनी लोकसेवक वाघमारे यांचेशी कामासदंर्भात बोलणी केली त्यावेळी माझे समक्ष लोकसेवक यांनी मागणी केलेल्या लाच रकमे ची मागणी केली असता तक्रारदार यांनी त्यांच्या पँटच्या पुढील बाजुच्या उजव्या खिशात असलेली लाच रक्कम उजव्या हाताने काढुन लोकसेवक राजेंद्र वाघमारे यांचेसमोर धरली असता वाघमारे यांनी ती उजव्या हाताने स्विकारुन डाव्या हातात घेऊन त्यांचे नेसत्या पँटच्या डाव्या खिशात ठेवली. त्यानंतर तक्रारदार हे वाघमारे यांचेशी बोलत बोलत कार्यालयाचे बाहेर येत असताना अचानक वाघमारे हे तेथुन पळत सुटले त्यावेळी तक्रारदार हे त्यांना धरा धरा असे ओरडले असता त्याचे पाठोपाठ आम्ही व सापळा पथक त्यांचे पाठोपाठ तक्रारदार पळत गेलो त्यावेळी पथकाने तहसिल कार्यालयाच्या गेट समोरील रस्त्यावर पकडले सदर वेळी त्यांचे दोन्ही हात पोलीस निरीक्षक हट्टेकर यांनी पकडले व त्यानंतर त्यांना ताब्यात घेऊन त्यांचे कार्यालयात आलो अशी हकिकत सांगितली.

त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना सापळा कारवाईसाठी गेले पासुन येई पर्यंत काय झाले याबाबत विचारणा करता तक्रारदार यांनी सांगितले की,मी व पंच क्र.01 श्री.घनवट असे लोकसेवक राजेंद्र वाघमारे यांचे कार्यालयात गेलो सदर वेळी माझेत व लोकसेवक राजेंद्र वाघमारे यांचेमध्ये माझे कामासंदर्भात चर्चा झाली त्यावेळी लोकसेवक वाघमारे मला “ते हयांचा ..हे ते दया… हे करा … ते चाळीस दया…. अ.. या कि तुम्ही इकड या कि तुम्ही आत या” असे बोलले असता मी माझे नेसत्या पँट च्या उजव्या खिशात ठेवलेली लाच रक्कम काढुन त्यांचे समोर धरली त्यावेळी वाघमारे यांनी लाच रक्कम उजव्या हाताने स्विकारुन डाव्या हातात घेऊन त्यांचे नेसत्या पँट च्या डाव्या खिशात ठेवली त्यानंतर काही वेळानेच त्यांनी लाच रक्कम खिशातुन काढुन मला “तुम्ही धरा तुमच्यापशी” असे म्हणाले त्यावर मी “चाळीस दिले आ” असे बोललो असता ते “तुम्ही धरा तुमच्यापाशी मी नोटीस देतो तुम्हाला”असे म्हणुन स्विकारलेली लाच रक्कम मला परत देण्याचा प्रयत्न करत होते.त्यानंतर मी व लोकसेवक वाघमारे बोलत बोलत त्यांचे कार्यालयाचे बाहेर आलो त्यावेळी मी लोकसेवकांनी लाच रक्कम स्विकारलेबाबत सापळा पथकास हातातील घडयाळ काढुन पुर्व नियोजीत इशारा केला असता अचानक वाघमारे हे तिथुन पळुन जाऊ लागलेने मी धरा धरा असे ओरडलो त्यावेळी आपण त्यांचा पाठलाग करुन त्यांना ताब्यात घेतले येणे प्रमाणे हकिकत सांगितली.

त्यानंतर लोकसेवक राजेंद्र वाघमारे यांनी फेकुन दिलेली लाच रक्कम शोधुन जप्त करणेसाठी जात असताना पोलीस निरीक्षक हट्टेकर यांनी राजेंद्र वाघमारे सर्कल यांचा हात पकडला व त्यांचेसहीत आम्ही ,सापळा पथक ,दोन्ही पंच असे कार्यालयाचे बाहेर आलो व लाच रक्कम शोधली असता तहसिल कार्यालयाचे मागिल बाजुच्या दरवाजा जवळील भिंतीजवळ असलेल्या गवतामध्ये मोबाईल फोन व फेकलेली लाचेची रक्कम मिळुन आली.सदर वेळी लोकसेवक राजेंद्र वाघमारे यांना मोबाईल त्यांचाच आहे का असे विचारले असता त्यांनी सदर मोबाईल त्यांचाच असलेचे सांगितले. त्यावेळी लाच रक्कम व मोबाईल फोन पंच क्र.02 श्री.सोनार यांना ताब्यात घेणेसाठी सुचना दिली त्यावेळी पंच क्र.02 यांनी लाच रक्कम व मोबाईल त्यांचे ताब्यात घेतला व

सदर लाच रकमे मधील नोटांचे नंबर सापळापुर्व कारवाई दरम्यान कागदावर लिहून ठेवलेल्या नोटांच्या नंबरची पंचक्र.02 यांनी खात्री केली असता तंतोतंत जुळून आले.त्यानंतर लोकसेवक राजेंद्र वाघमारे यांना घेऊन सगळे त्यांच्या कार्यालयात आलो.त्यावेळी आमचे सुचनेप्रमाणे पंच श्री.सोनार यांनी लोकसेवक राजेंद्र वाघमारे सर्कल यांनी फेकुन दिलेली शोधुन जप्त करण्यात आलेली रक्कम रु. 40,000/- सादर केली असता आम्ही नमुद दोन्ही पंचाना सदर लाचेची रक्कम पंचनाम्याव्दारे सिलबंद करण्यात येणार असल्याचे सांगितले.तसेच कार्यालयात परत लाच रकमे मधील नोटांचे नंबर सापळा कारवाई पुर्वी कागदावर लिहून ठेवलेल्या नोटांच्या नंबरशी खात्री केली असता तंतोतंत जुळून आले.

त्यानंतर लोकसेवक यांचे कार्यालयामध्ये लाईट बंद करुन कृत्रीम अंधारामध्ये लोकसेवक यांनी स्विकार करून पळुन जाताना फेकुन दिलेली लाच रक्कम पंचासमक्ष ताब्यात घेतली होती. सदर ताब्यात घेतलेली लाच रक्कम अल्ट्राव्हायलेट दिव्याच्या प्रकाशात पाहिली असता त्यावर फिक्कट निळसर रंगाची चकाकी दिसून आली.त्यानंतर लोकसेवक राजेंद्र वाघमारे सर्कल यांची तपासणी केली असता त्यांचे दोन्ही हाताला व पॅन्टचे पुढील बाजुचे डाव्या खिशाला ॲन्थ्रॉसीन पावडरची फिक्कट निळसर रंगांची चकाकी दिसून आली.सदर वेळी व्हीडीओ चित्रीकरण करण्यात आलेले आहे. सदर वेळी तक्रारदार यांचे कामासंदर्भात कागदपत्रांबाबत लोकसेवक राजेंद्र वाघमारे सर्कल यांना विचारणा करता त्यांनी सदर चे कागदपत्रे त्यांचे टेबलवर असल्याचे सांगितले त्यावेळी आम्ही सदर कागदपत्रे ताब्यात घेतली. सदर बाबत सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.

तरी दि.08.10.2025 रोजी तक्रारदार भास्कर लक्ष्मण कसगावडे यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दि.09.10.2025 रोजी पंचासमक्ष केलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान तक्रारदार भास्कर लक्ष्मण कसगावडे,वय-46 वर्षे ,धंदा शेती-व्यापार  रा.बोहाळी, ता.पंढरपुर .जि.सोलापुर यांनी विक्री केलेल्या शेती क्षेत्राच्या दस्ताची नोंद संबंधीत तलाठी यांनी धरुन ती नोंद मंजुरीकरीता मंडल अधिकारी वाघमारे यांचेकडे पाठवली होती. सदर नोंद फेटाळली असल्याचे सांगुन सदर नोंद प्रमाणित करणेसाठी व 7/12 उता-यावर जमीन खरेदी करणा-यांची नावाची नोंद मंजुर करण्यासाठी मंडल अधिकारी वाघमारे यांनी सुरवातीला 50,000/- लाच रकमेची मागणी करुन पंचासमक्ष तडजोडीअंती 40,000/- रुपयाची लाच मागणी करुन दि.09.10.2025 रोजी आलोसे वाघमारे यांचे कार्यालय रायगड भवन,पंढरपुर तहसिल कार्यालयाच्या पाठीमागे,पंढरपुर येथे पंचासमक्ष 40,000/- रुपये लाच रक्कम तक्रारदार भास्कर लक्ष्मण कसगावडे यांचेकडुन स्विकारली म्हणुन माझी श्री.राजेंद्र भगवान वाघमारे, मंडल अधिकारी, करकंब यांचेविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 चे कलम 7 प्रमाणे कायदेशिर फिर्याद आहे.

माझा वरील फिर्यादी जबाब माझे सांगणे प्रमाणे टंकलिखीत करण्यात आला असून तो मी वाचून  पाहीला असून बरोबर आहे.

हा फिर्यादी जबाब दिला....

**13.**

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)**

**Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):**

**(1)** **Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** vishvjeet bhagvanrao ghodke (पोलीस निरीक्षक) **or (किंवा):**

**(2)** **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):** **Rank (हुद्दा):**

**No. (क्र.):** **to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3)** **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**
**or (किंवा)**

**(4)** **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):** **on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).**

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)**

**R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)**

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** vishvjeet bhagvanrao ghodke

**Rank (हुद्दा):** I (Inspector)

**No. (क्र.):** DCPS15101000402VBGM8101J

**14.** **Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)**

**15.** **Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

I.I.F.-I (एकीकृत अन् वेषणफॉर्म - १)

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / seen )**
**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल् या/पाहिलेल् या) शारीरिक वैशिष् टये, व् यंग आणि इतर तपशील)**

| S. No. (अ.क्र) | Sex (लिंग) | Date / Year Of Birth (जन् मतारीख वर्ष) | Build (बांधा) | Height (cms) (उंची(सें.मी) | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच् या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | 1972 | | - | | चेचक: क्र. |

| Deformities / Peculiarities (व् यंग वैशिष् टये) | Teeth (दात) | Hair (केस) | Eye (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit (s) (पोषाखाच् या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language/Dialect (भाषा/बोली) | Place of (चे ठिकाण) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल् याच खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त् यापेक्षा अधिक तपशील दिल् यास फक् त यातील रकान् यांची नोंद घेतली जाईल)**